# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

MCAER कृषि परिषद

MCAER कृषि परिषद २००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी (०२०) २५५२८६८८.

संकेतस्थळ : www.mcaer.org


## जाहीर सूचना

**राज्यातील चार कृषि विद्यापीठे किंवा कृषि परिषद किंवा राज्य शासनाची मान्यता नसलेल्या कृषि संबंधित विद्यापीठ शैक्षणिक संस्था / अनधिकृत महाविद्यालये / अशासकीय संस्था / विद्यालयांमधील कृषी पदविका, कृषी व संलग्न पदवी, पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमांना प्रवेश न घेण्याबाबत**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्याअंतर्गत राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत महाराष्ट्र राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत बी.एससी. (ऑनर्स) कृषी पदवी, बी.एससी. (ऑनर्स) उद्यानविद्या पदवी, बी.एससी. (ऑनर्स) वनविद्या पदवी, बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी) पदवी, बी. टेक्. (कृषी अन्नतंत्रज्ञान), बी.एससी. (ऑनर्स) सामाजिक विज्ञान पदवी , बी.टेक्. (जैवतंत्रज्ञान) पदवी, बी.एफ्.एस्सी. (मत्स्यविज्ञान) पदवी आणि बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) पदवी या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. तसेच कृषी विद्यापीठांतर्गत कृषी तंत्र पदविका (मराठी माध्यम- २ वर्षे कालावधी), कृषी तंत्रनिकेतन (पुर्णइंग्रजी माध्यम - ३ वर्षे कालावधी) या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया कृषी विद्यापीठामार्फत केंद्रियभूत पद्धतीने राबविण्यात येणार आहे.

या सर्व उपरोक्त कृषिविषयक अभ्यासक्रमांना महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे / महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांची मान्यता असणे आवश्यक आहे. कृषी परिषदेच्या **www.mcaer.org** या संकेतस्थळावर वरील सक्षम प्राधिकरणांची मान्यता असलेल्या कृषी पदविका व कृषी व संलग्न महाविद्यालयांची यादी उपलब्ध आहे.

येथे असे नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता

तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ (सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०) करण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात कृषी शिक्षणासाठी अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्यात आली आहे.

तसेच महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम, १९८३ मधील कलम ९ अन्वये "राज्यामध्ये कोणतेही कृषित्तर विद्यापीठ स्थापना करण्याशी संबंधित कोणत्याही अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, असे कोणतेही विद्यापीठ कृषि विषयातील कोणतेही पदविका, प्रमाणपत्र किंवा विद्याविषयक इतर विशेषोपाधी देण्यास सक्षम असणार नाही."

याअनुषंगाने व्यावसायिक / अव्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशोच्छुक विद्यार्थीवर्ग व पालक यांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे / महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली हया सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसल्यास अशा विद्यापीठ / शैक्षणिक संस्था / महाविद्यालये / विद्यालयांमध्ये प्रवेश घेऊ नये.

सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसलेली विद्यापीठ अथवा अनधिकृत संस्था प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना खोटी अमिषे दाखवून अथवा संस्था मान्यताप्राप्त आहे असे भासवून प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात व नंतर विद्यार्थ्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येते. अशाप्रकारच्या तक्रारी कृषी परिषदेकडेही येत असतात. या पार्श्वभूमीवर सर्व प्रवेशोच्छुक विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना सतर्क करण्यात येते की, कोणत्याही अनधिकृत संस्थेच्या अथवा विद्यापीठाच्या भूलथापांना बळी न पडता अभ्यासक्रमाची संलग्नता तपासून घ्यावी. तसेच कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अथवा सक्षम प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर संबंधित महाविद्यालयाचे नाव व अभ्यासक्रम असल्याची खात्री करावी व नंतरच प्रवेश घ्यावा. उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्रातील महाविद्यालये / विद्यापीठाच्या मान्यतेबाबत कृषी परिषदेशी किंवा चार कृषी विद्यापीठांशी संपर्क साधल्यास त्याबाबतची अधिक माहिती देण्यात येईल.

जा.क्र. मकृप/ शिक्षण-१/ ५१८/ १३४७
दिनांक- २४ ऑगस्ट,२०२०

**स्वाक्षरीत/-**
**(हरिहर कौसडीकर)**
**सक्षम प्राधिकारी तथा संचालक (शिक्षण),**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद**

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी (०२०) २५५२ ८६८८.

वेबसाईट : www.mcaer.org


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/५१८/१२९७ दि. १७/०८/२०२०

## कृषी परीषद व महात्मा फुले कृषि विद्यापीठाची मान्यता नसलेल्या विद्यापीठ / अनधिकृत महाविद्यालये / शैक्षणिक संस्था / विद्यालयांमधील कृषि पदविका, कृषि व संलग्न पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश न घेण्याबाबत जाहीर सुचना

## विशेष जाहीर सुचना

'राष्ट्रीय मागासवर्गीय कृषि विद्यापीठ, सोलापुर तडवल रोड, ता. अक्कलकोट, जि. सोलापुर' नामक विद्यापीठाचे 'राष्ट्रीय मागासवर्ग कृषि विद्यालय माहिती व तंत्रज्ञान' या नावाने महाविद्यालये अथवा विद्यालये आहेत. यामध्ये संबंधित कार्यक्षेत्रातील कृषि विद्यापीठांच्या चौकशी अहवालानुसार कृषि पदविका (Agril. Deploma) व कृषि पदवी [B.Sc (Agri.)] अभ्यासक्रम चालु असल्याचे निदर्शनास आले आहे. या अभ्यासक्रमांना कृषि परिषद किंवा राज्यातील चारही कृषि विद्यापीठांची मान्यता नाही. अशाप्रकारे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत खालील विद्यालये / महाविद्यालये /विद्यापीठ / संस्था कार्यरत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

**कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

| जिल्हा | विद्यापीठ / महाविद्यालये / संस्था | गाव / तालुका | | |
|---|---|---|---|---|
| **अहमदनगर** | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषि महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | जामखेड | वाघोली | वाळुद |
| | | पाथर्डी | | |
| **पुणे** | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषि महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | आंबेगाव | आर्वी ता. जुन्नर | |
| **जळगाव** | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषि महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | नेरीवडगाव | | |

| जिल्हा | विद्यापीठ / महाविद्यालये / संस्था | गाव / तालुका | | |
|---|---|---|---|---|
| **धुळे** | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषि महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | धुळे | | |
| **कोल्हापुर** | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषि महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | अडकुर- चांदवड | कोडोली, ता. पन्हाळा | |
| **सांगली** | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषि महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | शिरसगाव, ता. वाळवा | दिघंची ता. आटपाडी | |
| **नाशिक** | राष्ट्रीय मागासवर्गीय खुले कृषि महाविद्यालय | हिरापुर (दरसवाडी), ता. चांदवड | चणकापुर, ता. कळवण | |
| **सोलापुर** | मागासवर्गीय खुले कृषि महाविद्यालय | सांगोला | पंढरपुर | माढा |
| | | बार्शी | करमाळा | मंगळवेढा |
| | | दक्षिण सोलापुर | मोहोळ | |
| | सिध्देवर प्रसाद बहुउद्देशिय सेवा संस्था | सोलापुर | | |
| | राष्ट्रीय मागासवर्गीय खुले कृषि महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान | सोलापुर | अक्कलकोट | |
| | डॉ. बाबासाहेब आंबेडकर रयत वतन रेजिमेंट | सोलापुर | कोन्हाळी, तडवळ-रेल्वे स्टेशन ता. अक्कलकोट | तेरामैल, ता. दक्षिण सोलापुर |
| | डॉ. बाबासाहेब आंबेडकर रयत वतन रेजिमेंट | बरूर, ता. दक्षिण सोलापुर | करकंब, भाळवणी ता. पंढरपुर | महुद, ता. सांगोला |
| | | सासुर्डे, ता. बार्शी | कोन्हाळी, ता. पंढरपुर | करकंब, ता. पंढरपुर |
| | | माळशिरस | | |
| | राष्ट्रीय मागासवर्गीय कृषि विद्यापीठ, सोलापूर | तडवल रोड, ता. अक्कलकोट | | |
| | राष्ट्रीय कृषि शिक्षण संस्थान शोध आणि संशोधन | विजापुर रोड, ता. सोलापुर | | |

**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
**आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**
**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**
**ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com** **दूरध्वनी (०२०) २५५२ ८६८८.**
**वेबसाईट : www.mcaer.org**

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/५१८/१२९७ दि. १७/०८/२०२०

**कृषी परीषद व डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाची मान्यता नसलेल्या विद्यापीठ / अनधिकृत महाविद्यालये / शैक्षणिक संस्था / विद्यालयांमधील कृषि पदविका, कृषि व संलग्न पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश न घेण्याबाबत जाहीर सुचना**

**विशेष जाहीर सुचना**

'राष्ट्रीय मागासवर्गीय कृषि विद्यापीठ, सोलापुर तडवल रोड, ता. अक्कलकोट, जि. सोलापुर' नामक विद्यापीठाचे 'राष्ट्रीय मागासवर्ग कृषि विद्यालय माहिती व तंत्रज्ञान' या नावाने महाविद्यालये अथवा विद्यालये आहेत. यामध्ये संबंधित कार्यक्षेत्रातील कृषि विद्यापीठांच्या चौकशी अहवालानुसार कृषि पदविका (Agril. Deploma) व कृषि पदवी [B.Sc (Agri.)] अभ्यासक्रम चालु असल्याचे निदर्शनास आले आहे. या अभ्यासक्रमांना कृषि परिषद किंवा राज्यातील चारही कृषि विद्यापीठांची मान्यता नाही. अशाप्रकारे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत खालील विद्यालये / महाविद्यालये /विद्यापीठ / संस्था कार्यरत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

**कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र : डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**

| जिल्हा | विद्यापीठ / महाविद्यालये / संस्था | गाव / तालुका |
|---|---|---|
| **बुलडाणा** | राष्ट्रीय मागासवर्गीय कृषि विद्यालय माहिती व तंत्रज्ञान | येळगाव ता. बुलडाणा |

**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**

**आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

MCAER कृषि परिषद

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

MCAER कृषि परिषद २००८-२००९

**ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com** **दूरध्वनी (०२०) २५५२ ८६८८.**

**वेबसाईट : www.mcaer.org**

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/५१८/१२९७ दि. १७/०८/२०२०

**कृषी परीषद व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाची मान्यता नसलेल्या विद्यापीठ / अनधिकृत महाविद्यालये / शैक्षणिक संस्था / विद्यालयांमधील कृषि पदविका, कृषि व संलग्न पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश न घेण्याबाबत जाहीर सुचना**

## <u>विशेष जाहीर सुचना</u>

‘राष्ट्रीय मागासवर्गीय कृषि विद्यापीठ, सोलापुर तडवल रोड, ता. अक्कलकोट, जि. सोलापुर’ नामक विद्यापीठाचे ‘राष्ट्रीय मागासवर्ग कृषि विद्यालय माहिती व तंत्रज्ञान’ या नावाने महाविद्यालये अथवा विद्यालये आहेत. यामध्ये संबंधित कार्यक्षेत्रातील कृषि विद्यापीठांच्या चौकशी अहवालानुसार कृषि पदविका (Agril. Deploma) व कृषि पदवी [B.Sc (Agri.)] अभ्यासक्रम चालु असल्याचे निदर्शनास आले आहे. या अभ्यासक्रमांना कृषि परिषद किंवा राज्यातील चारही कृषि विद्यापीठांची मान्यता नाही. अशाप्रकारे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत खालील विद्यालये / महाविद्यालये /विद्यापीठ / संस्था कार्यरत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

**कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र : वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी**

| **जिल्हा** | **विद्यापीठ / महाविद्यालये / संस्था** | **गाव / तालुका** | | |
|---|---|---|---|---|
| **बीड** | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषि महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | धारूर | कासार मुर्शदपुर ता. काष्टी | चिखली बीड ता. वडवणी |
| | | शिरूर, ता. बीड | मोरगाव, ता. बीड | पेठसांगवी, ता. केज |
| | | युसुफवडगाव, ता. केज | | |

| जिल्हा | विद्यापीठ / महाविद्यालये / संस्था | गाव / तालुका | | |
|---|---|---|---|---|
| लातुर | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषि महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | तपसे चिंचाली | शिरूर अंनतपाळ | पेठ |
| | | करडखेल | चाकुर | किनगाव |
| | | निवाडा, ता. रेणापुर | | |
| औरंगाबाद | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषि महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | हत्तनूर, ता. कन्नड | | |
| उस्मानाबाद | मागासवर्गीय व खुले कृषि महाविद्यालय | उस्मानाबाद | | |
| | छत्रपती शाहु महाराज बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ | उस्मानाबाद | | |
| | राष्ट्रीय कृषि विद्यालय माहिती व तंत्रज्ञान | शिंगोली, ता. उस्मानाबाद | | |
| | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषि महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | खेड- लोहारा | उमरगा | रूई-ढोकी |
| | | नळदुर्ग | तुळजापुर | |

**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
**आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**
**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**
**ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com** **दूरध्वनी (०२०) २५५२ ८६८८.**
**वेबसाईट : www.mcaer.org**

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/५१८/१२९७ दि. १७/०८/२०२०

**कृषि परीषद व डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाची मान्यता नसलेल्या विद्यापीठ / अनधिकृत महाविद्यालये / शैक्षणिक संस्था / विद्यालयांमधील कृषि पदविका, कृषि व संलग्न पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश न घेण्याबाबत जाहीर सुचना**

## विशेष जाहीर सुचना

'राष्ट्रीय मागासवर्गीय कृषि विद्यापीठ, सोलापुर तडवल रोड, ता. अक्कलकोट, जि. सोलापुर' नामक विद्यापीठाचे 'राष्ट्रीय मागासवर्ग कृषि विद्यालय माहिती व तंत्रज्ञान' या नावाने महाविद्यालये अथवा विद्यालये आहेत. यामध्ये संबंधित कार्यक्षेत्रातील कृषि विद्यापीठांच्या चौकशी अहवालानुसार कृषि पदविका (Agril. Deploma) व कृषि पदवी [B.Sc (Agri.)] अभ्यासक्रम चालु असल्याचे निदर्शनास आले आहे. या अभ्यासक्रमांना कृषि परिषद किंवा राज्यातील चारही कृषि विद्यापीठांची मान्यता नाही. अशाप्रकारे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत खालील विद्यालये / महाविद्यालये / विद्यापीठ / संस्था कार्यरत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

**कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र : डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**

| जिल्हा | विद्यापीठ / महाविद्यालये / संस्था | गाव / तालुका |
|---|---|---|
| **ठाणे** | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषि महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | किनवली, ता. शहापुर |